Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

पोटच्या पोराच्या विक्री प्रकरणात धक्कादायक माहिती उघड! (पान २ वर)



। बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १७० । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

बँकेच्या निवडणुकीतील राजकीय हालचालींना वेग

सांगली : सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी राजकीय हालचालींना वेग आला. मंगळवारी तब्बल ४७ उमेदवारांनी ६४ अर्ज दाखल केले. यामध्ये खासदार विशाल पाटील, आमदार डॉ. विश्वजीत कदम यांच्यासह संग्रामसिंह देशमुख, देवराज पाटील, शैलजा पाटील, पूजा विशाल पाटील, स्वाती सुशांत खाडे, अस्मिता बाळासाहेब होनमोरे, शशिकांत नागे, भालचंद्र पाटील, दिग्विजय सूर्यवंशी आणि रावसाहेब पाटील यांचा समावेश आहे. मंगळवारअखेर जिल्हा बँकेसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची संख्या १२१ वर पोहोचली आहे. अर्ज दाखल करण्यासाठी आता केवळ दोन दिवस शिल्लक असून, गुरुवार दि. १ ऑक्टोबर हा अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस आहे. दोन दिवसांत प्रमुख राजकीय गटांकडून आणखी अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.

निवडणूक आयोगाविरोधात ठाकरे बंधू आक्रमक, 4 ऑक्टोबरला आंदोलन

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी मोर्चा!

दोन्ही ठाकरे बंधूंनी दिलीमाहिती, मोर्चा सर्व राजकीय पक्ष तसेच जनतेसाठी खुला

जन सम्राट टाईम्स

मुंबई । मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेसने रणशिंग फुंकले असताना शिवसेना (उबाठा) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एसआयआर मोहिमेविरोधात रविवारी, ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत संयुक्त मोर्चा काढण्याची घोषणा केली.

दोन्ही ठाकरे बंधूंनी मंगळवारी संयुक्त पत्रकार परिषदेत वरील माहिती दिली. ४ ऑक्टोबरला सकाळी १० वाजता भायखळा येथील रिचर्डसन ॲण्ड क्रुडास या कंपनीजवळून मोर्चा निघून मुंबई महापालिकेच्या मुख्यालयाजवळ समाप्त होईल. तिथे मोर्चाचे रुपांतर सभेत होईल. सभेत निवडणूक आयोगाच्या कारभाराबाबत भूमिका मांडली जाईल. हा मोर्चा सर्व राजकीय पक्ष तसेच जनतेसाठी खुला असेल, असे राज ठाकरे यांनी सांगितले. मोर्चावेळी आमदार आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, बाळा नांदगावकर उपस्थित राहणार आहेत.पत्रकार परिषदेत मोर्चाची दिशा आणि रूपरेषा स्पष्ट करताना राज ठाकरे म्हणाले, "चार तारखेला हा संयुक्त मोर्चा निघेल. भायखळा वरून हा मोर्चा निघेल आणि मुंबई महानगरपालिकेच्या समोर तिथे व्यासपीठ असेल आणि तिथे त्याचे रूपांतर सभेमध्ये होईल. सकाळी दहा वाजताची



वेळ आहे. मोर्चात काय बोलायचे ते आम्ही बोलू. परंतु, हा निवडणूक आयोगाच्या विरोधातला मोर्चा आहे. गेली अनेक वर्ष या विषयांवर आम्ही बोलत आलोय. 2017-18 मध्ये मी अनेक नेत्यांना या संदर्भात भेटलो होतो. ईव्हीएम मशीनच्या संदर्भात मी भेटलो होतो, या विषयावर सविस्तर बोलणं चार तारखेला होईल."या मोर्चात पक्षीय राजकारण नसेल हे स्पष्ट करत राज ठाकरे पुढे म्हणाले, "या मोर्चानंतर त्याची पुढील रूपरेषा आम्ही ठरवू. आम्ही सर्वच राजकीय पक्षांना आमंत्रण देणार आहे. सत्ताधारी पक्षातील लोकांना व्यासपीठावर यायचं असेल तर ते देखील येऊ शकतात. निवडणूक आयोगाचा गेल्या काही वर्षातला जो कारभार आहे त्या विरोधात हा मोर्चा आहे." राज ठाकरे पुढे म्हणाले की, "प्रत्येकाला फोन करून सांगितले जाईल. या मोर्चात कोणत्याही राजकीय पक्षाचे झेंडे नसतील. यात सर्वांच्या हातात तिरंगाच असणार आहे. हा विषय या देशातील लोकशाही वाचवण्याचा आणि संविधान वाचवण्याचा आहे. त्यामुळे सर्वांच्या हातात तिरंगाच असेल."'विरोधी पक्षाला त्यांच्या पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर सोडायचे आहे', असा आरोप भाजपकडून केला जात आहे. याबाबत पत्रकारांनी विचारले असता, राज ठाकरे यांनी अतिशय मार्मिक आणि एका वाक्यात टोला लगावला. राज ठाकरे म्हणाले की, "मराठीमध्ये एक म्हण आहे खाई त्याला खवखवे", असे म्हणत त्यांनी भाजपचा विषय एका वाक्यात संपवला.

काँग्रेसचे पत्र : राज्यातील एसआयआर प्रक्रियेत दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी १२ ऑक्टोबरपर्यंत देण्यात आलेली मुदत अपुरी असल्याचा दावा करीत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आणखी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांना पत्र पाठविले आहे.

"मोर्चा निवडणूक आयोगाच्या विरोधातील आहे. त्यामुळे सत्ताधारी पक्षातील लोकांना या आंदोलनात सहभागी व्हायचे असल्यास तेही येऊ शकतात. मोर्चासाठी राजकीय पक्षांच्या नेत्यांना औपचारिक पत्र देण्याऐवजी फोनवरून संपर्क साधून निमंत्रण दिले जाणार आहे. - **राज ठाकरे,** मनसेचे अध्यक्ष

कर्मचाऱ्यांसाठी मोठी बातमी! जम्मू-काश्मीरमध्ये पात्र कर्मचाऱ्यांना OPS निवडण्याची संधी

जन सम्राट टाईम्स

श्रीनगर । प्रतिनिधी: जुनी पेन्शन योजना अर्थात Old Pension Scheme (OPS) लागू करण्याची मागणी करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जम्मू-काश्मीरमधून महत्त्वाची बातमी समोर आली आहे. जम्मू-काश्मीर सरकारच्या वित्त विभागाने 28 सप्टेंबर 2026 रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, नवीन पेन्शन योजना (NPS) लागू करण्यापूर्वी ज्या पदांच्या भरतीची जाहिरात किंवा अधिसूचना प्रसिद्ध झाली होती, मात्र त्या पदांवर नियुक्ती नंतर झाली, अशा पात्र कर्मचाऱ्यांना OPS अंतर्गत समाविष्ट होण्याची संधी देण्यात आली आहे. जम्मू-काश्मीर सरकारच्या अधिकृत आदेशात NPS लागू करणाऱ्या SRO-400 दिनांक 24 डिसेंबर 2009 पूर्वी जाहिरात किंवा अधिसूचित झालेल्या पदांवर नियुक्त झालेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना Defined Pension Scheme म्हणजेच जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आली आहे.

कोणत्या कर्मचाऱ्यांना मिळणार लाभ?

या निर्णयाचा लाभ प्रत्येक NPS कर्मचाऱ्याला मिळणार नाही. 24 डिसेंबर 2009 पूर्वी संबंधित पदाची भरती जाहिरात किंवा अधिसूचना प्रसिद्ध झालेली असणे, हा यातील महत्त्वाचा निकष आहे. त्यानंतर संबंधित भरती प्रक्रियेतून कर्मचारी 1 जानेवारी 2010 किंवा त्यानंतर सेवेत रुजू झाला असेल, तर नियमांनुसार त्याला OPS अंतर्गत समाविष्ट होण्याची संधी मिळू शकते. म्हणजेच, भरतीची प्रक्रिया किंवा जाहिरात NPS लागू होण्यापूर्वीची असताना नियुक्ती मात्र त्यानंतर झाली, अशा कर्मचाऱ्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. शासनाच्या आदेशाचा उद्देश अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या भरतीच्या मूळ तारखेच्या



पार्श्वभूमीवर जुनी पेन्शन व्यवस्थेचा पर्याय उपलब्ध करून देणे हा आहे. 'वन टाइम ऑप्शन' महत्त्वाचा या निर्णयातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पात्र कर्मचाऱ्यांना OPS निवडण्यासाठी एकदाच पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांनी शासनाने निश्चित केलेल्या प्रक्रियेनुसार आपल्या विभागाशी संपर्क साधणे आणि आवश्यक पर्यायपत्र सादर करणे महत्त्वाचे ठरणार आहे. NPS मधून OPS मध्ये जाण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे आवश्यक कागदपत्रे आणि Option Form सादर करण्याची प्रक्रिया शासनाच्या आदेशानुसार पार पाडावी लागेल. इतर राज्यांतील कर्मचाऱ्यांचेही लक्ष जम्मू-काश्मीर सरकारच्या या निर्णयामुळे देशातील इतर राज्यांमधील NPS लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या अपेक्षांनाही उधाण आले आहे. या आदेशाचा थेट परिणाम देशभरातील किंवा केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांवर होतो, असे मानता येणार नाही. OPS आणि NPS याबाबत सरकारी कर्मचारी संघटनांकडून विविध स्तरांवर मागण्या केल्या जात आहेत. त्यामुळे जम्मू-काश्मीरमधील या निर्णयाकडे इतर राज्यांतील कर्मचारी आणि कर्मचारी संघटनांचेही लक्ष लागले आहे.

जुनी पेन्शन योजना अर्थात Old Pension Scheme (OPS) लागू करण्याची मागणी करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जम्मू-काश्मीरमधून महत्त्वाची बातमी समोर आली आहे. जम्मू-काश्मीर सरकारच्या वित्त विभागाने 28 सप्टेंबर 2026 रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, नवीन पेन्शन योजना (NPS) लागू करण्यापूर्वी ज्या पदांच्या भरतीची जाहिरात किंवा अधिसूचना प्रसिद्ध झाली होती, मात्र त्या पदांवर नियुक्ती नंतर झाली, अशा पात्र कर्मचाऱ्यांना OPS अंतर्गत समाविष्ट होण्याची संधी देण्यात आली आहे. जम्मू-काश्मीर सरकारच्या अधिकृत आदेशात NPS लागू करणाऱ्या SRO-400 दिनांक 24 डिसेंबर 2009 पूर्वी जाहिरात किंवा अधिसूचित झालेल्या पदांवर नियुक्त झालेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना Defined Pension Scheme म्हणजेच जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आली आहे.

नरहरी झिरवाळ आणि संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांचा घेराव

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी: नाशिकमधून एक मोठी बातमी समोर येत आहे. नाशिक जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेत राडा झाल्याची माहिती मिळत आहे. या सभेत आपल्या मुद्द्यांवर चर्चा न झाल्याचा दावा करत शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. या सभेत शेतकरी प्रचंड आक्रमक झाले. शेतकऱ्यांकडून सभेतच अभूतपूर्व गोंधळ घालण्यात आला. शेतकरी इतके आक्रमक झाले होते की, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, प्रशासक संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांचा सभेतच घेराव घातला. तसेच त्यांना धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न झाल्याची देखील माहिती समोर येत आहे. सभेत झालेला गदारोळ पाहता पोलिसांनी मध्यस्थी केली. पोलिसांच्या बंदोबस्तात नरहरी झिरवाळ यांना सभेतून बाहेर काढण्यात आलं. यानंतर शेतकऱ्यांनी प्रशासक संतोष बिडवई यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही शेतकऱ्यांनी बिडवाई यांना धक्काबुक्कीचा प्रयत्न केल्याचा दावा केला जातोय.

तणावाची परिस्थिती पाहता मंत्री नरहरी झिरवाळ आणि प्रशासन संतोष बिडवई यांनी तिथून काढता पाय घेतला. 'बाप म्हातारा झालाय, पण अजूनही हातात जादू आहे'; मराठी शेतकऱ्याने ऑस्ट्रेलियाची जमीन मुलासाठी केली



हिरवीगार, बागेचा व्हिडीओ व्हायरल भुकेल्या पिल्लासाठी आईनं अख्खं झाड हलवलं, फळांचा पाऊस पाहून पिल्लू लागलं नाचू, हत्तीणीचा व्हिडीओ पाहून तुम्हीही व्हाल भावुक Iran ने US चे Reemus 600 drone केले जप्त, Indian ocean पर्यंत संघर्ष वाढवण्याचे IRGC चे संकेत नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्वसाधारण सभेत सोमवारी शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत जोरदार गोंधळ घातला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी राष्ट्रगीत म्हणत सभा गुंडाळण्यात आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी सभेतच आक्रमक पवित्रा घेतला. या प्रकारामुळे सभास्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. शेतकऱ्यांची भूमिका काय? निफाड साखर कारखान्यातील कथित घोटाळ्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली होती. मात्र, या विषयावर चर्चा न झाल्याने शेतकरी संतप्त झाले. विविध प्रश्न मांडल्यानंतरही त्यावर चर्चा न करता सभा गुंडाळली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. राष्ट्रगीत सुरू झाल्यानंतरही शेतकऱ्यांनी आपला आक्षेप नोंदवत घोषणाबाजी केली. झिरवाळ आणि बिडवई यांना घेराव दरम्यान, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ आणि बँकेचे प्रशासक संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांनी सभेतच घेराव घातला. यावेळी दोघांनाही धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगण्यात आले.

सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक

जम्मू : दक्षिण काश्मीरमधील युसमार्ग येथे मंगळवारी रात्री उशिरा सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत 'लष्कर-ए-तोयबा'चा प्रमुख कमांडर सुलेमान शाह उर्फ फौजी मुसा ठार झाला. गुप्त माहितीच्या आधारे, भारतीय लष्कर, जम्मू आणि काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफने कोरग परिसरात संयुक्त शोधमोहीम सुरू केली. सुरक्षा दलांना पाहताच दहशतवाद्यांनी गोळीबार केला. त्यानंतर झालेल्या जोरदार चकमकीत मुसा ठार झाला. आणखी तीन दहशतवादी लपून बसल्याचा संशय आहे. भारतीय लष्कराने संपूर्ण परिसराला घेराव घातला असून, रात्रभर शोधमोहीम सुरू केली.

'ठाकरेंवर टीका करून तुमची पापं झाकली जाणार नाहीत

सामंतांवर भास्कर जाधव संतापले

जन सम्राट टाईम्स



नाशिक | प्रतिनिधी: राज्य सरकारने शेतकऱ्यांच्याहष्टीने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत राज्यातील 358 पैकी 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर याबाबतचा शासन निर्णय काढण्यात आला असून महाराष्ट्रातील तब्बल 75 टक्के भागात दुष्काळ जाहीर झाला आहे. सरकारने दुष्काळ जाहीर केल्यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी यावर प्रतिक्रिया देत काही प्रश्न उपस्थित केले होते. यावरूनच मंत्री उदय सामंत यांनी आदित्य ठाकरेंवर निशाणा साधला होता. घरातून आता बाहेर पडलेत, त्यांचे अभिनंदन, असे उदय सामंत म्हणाले होते. आता उदय सामंत यांच्या या टीकेला ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार भास्कर जाध यांनी अतिशय आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिले आहे.

उदय सामंत यांच्यावर जोरदार हल्लाबोल करताना भास्कर जाधव म्हणाले की, बाजार बुणगे सत्ताधाऱ्यांना शेतकऱ्यांचे दुःख कळणार नाही, माझ्या मतदारसंघातील शेतकऱ्याचे अश्रू पुसायला सरकारला भाग पडणार. ठाकरे घरातून बाहेर पडत नाहीत असं सत्ताधारी लोकांचे तुणतुणे कायम असतं, पण उदय सामंत यांनी ठाकरेंना बोलण्यापेक्षा दुष्काळग्रस्त भागात जिल्ह्यातले केवळ तीन तालुके आलेत याची जबाबदारी घेतली पाहिजे. मुख्यमंत्र्यांना सामंत जाब विचारणार आहेत का? ठाकरेंवर टीका करून तुमची पापं झाकली जाणार नाहीत, अशी टीका त्यांनी केली.सिंधुदुर्गातील जमीन परप्रांतीय लोकांना विकल्या संदर्भातील आरोपांवर बोलताना आमदार भास्कर जाधव यांनी मुख्यमंत्र्यांकडे थेट चौकशीची मागणी केली आहे. परप्रांतीय लोकांना जमीन देण्यासाठी दलाली करणारा मंत्री कोण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः समोर येऊन महाराष्ट्राला सांगावे अशी मागणी त्यांनी केली. पुढे बोलताना ते म्हणाले की, फडणवीस मंत्र्याला पाठीशी घालतील पण त्याचे नाव सांगणार नाहीत. तसेच खासदार संजय राऊत यांनी केलेला आरोप गंभीरअसून मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेतली पाहिजे असेही जाधव म्हणाले.रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडल्यानंतर आमदार भास्कर जाधव यांनी निधी वाटपावर अतिशय गंभीर आरोप केले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात आपण एकमेव विरोधी आमदार असून निधी वाटपात दुजाभाव केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. आपण प्रतिनिधित्व करत असलेल्या गुहागर तालुक्यातील एका माजी आमदाराला आपल्यापेक्षा चारपट निधी देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. अपेक्षित असल्याचे सांगताना त्यांनी नमूद केले की, पाऊस आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बैठक लांबत गेली आणि तब्बल आठ महिन्यांनंतर डीपीडीसीची बैठक झाली. सध्या लोकप्रतिनिधी नसलेल्या आणि ग्रामपंचायत सदस्यही नसलेल्या एका माजी आमदाराला चार कोटी रुपयांचा निधी दिल्याचा आरोप त्यांनी केला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

तांदूळ भेसळीच्या आरोपांनी इगतपुरीत खळबळ; झिरवाळांशी संवादाचा प्रयत्न

परराज्यातून तांदूळ आणून घोटीत भेसळ होत असल्याचा आरोप, चौकशीची मागणी

जन सम्राट टाईम्स

इगतपुरी । प्रतिनिधी: इगतपुरी तालुक्यातील तांदूळ भेसळीच्या कथित प्रकारावरून वातावरण तापले आहे. परराज्यातून तांदूळ आणून घोटी परिसरात त्यामध्ये भेसळ केली जात असून, इगतपुरी-घोटी-त्र्यंबकेश्वरच्या नावाने हा तांदूळ देशभर विकला जात असल्याचा आरोप भूमिपुत्र फाउंडेशनचे विनोद नाठे यांनी केला आहे. या प्रकारामुळे तालुक्याची आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या उत्पादनाची बदनामी होत असल्याचा दावा करत त्यांनी संबंधित यंत्रणेकडून सखोल चौकशीची मागणी केली आहे. नाठे यांच्या म्हणण्यानुसार, इगतपुरी तालुक्यातील शेतकरी तांदळाला योग्य भाव मिळावा यासाठी संघर्ष करत असताना दुसरीकडे भेसळयुक्त तांदूळ तालुक्याच्या नावाने बाजारात विकला जात असल्याचा प्रकार गंभीर आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांसह जिल्हा परिषदेत धाव तांदूळ भेसळीच्या आरोपांची चौकशी करण्याच्या मागणीसाठी नाठे हे काही शेतकऱ्यांसह नाशिक जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांच्या कार्यालयात गेले होते. यावेळी कार्यालयात नरहरी झिरवाळ यांची बैठक सुरू असल्याने आपण बाहेर थांबलो होतो, अशी माहिती नाठे यांनी दिली. बैठक संपल्यानंतर तांदूळ भेसळीच्या मुद्द्यावर झिरवाळ यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केल्याचेही त्यांनी सांगितले. याचवेळी घडलेल्या प्रकारावरून आता



नाठे आणि झिरवाळ यांच्यातील संवादाचा मुद्दाही चर्चेत आला आहे. मोबाईलवरून वादाचा दावा नाठे यांच्या दाव्यानुसार, झिरवाळ यांच्याशी होणारा संवाद रेकॉर्ड करण्यासाठी त्यांनी आपला मोबाईल एका शेतकऱ्याच्या हातात दिला होता. त्यावेळी झिरवाळ यांच्या स्वीय सहाय्यकाने मोबाईल बंद करून घेतल्याचा आरोप नाठे यांनी केला आहे. तसेच 'परवानगी घेतली का?' असा सवाल करत मोबाईल हिसकावल्याचाही त्यांनी दावा केला. यानंतर नाठे यांनी स्वतः सेल्फी व्हिडिओ सुरू करून तांदूळ भेसळीच्या आरोपांबाबत झिरवाळ यांना प्रश्न विचारल्याचे सांगितले. मात्र, या प्रश्नांना उत्तर न देता झिरवाळ तेथून निघून जाण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा नाठे यांनी केला आहे. या संपूर्ण घटनेमुळे तांदूळ भेसळीचा मूळ मुद्दा बाजूला पडून मोबाईल रेकॉर्डिंग आणि संवादावरूनही चर्चा सुरू झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याचा आरोप तांदूळ भेसळीबाबत यापूर्वीही वारंवार तक्रारी करण्यात आल्या असून, त्यानंतरही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप नाठे यांनी केला. काही स्थानिक नेत्यांच्या भेटीगाठींमुळे कारवाईला विलंब होत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. मात्र, या आरोपांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. घोटी परिसरातील तांदूळ भेसळीच्या कथित प्रकाराची संबंधित अन्न व प्रशासन यंत्रणांनी स्वतंत्रपणे तपासणी करावी, नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करावी आणि आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नाठे यांनी केली आहे. प्रशासनाच्या कारवाईकडे लक्ष या प्रकरणात प्रशासनाकडून अद्याप अधिकृतपणे काय भूमिका घेण्यात आली आहे, हे स्पष्ट झालेले नाही. तांदळाच्या नमुन्यांची तपासणी, उत्पादनाचे मूळ, पॅकिंग आणि विक्रीची साखळी यांची चौकशी झाल्यानंतरच आरोपांमध्ये तथ्य किती आहे, हे स्पष्ट होऊ शकते. दरम्यान, या प्रकरणात तुकाराम मुंडे यांनी लक्ष घालून संबंधित यंत्रणेला चौकशीचे निर्देश द्यावेत, अशी मागणीही नाठे यांनी केली आहे. त्यामुळे तांदूळ भेसळीच्या आरोपांची प्रशासनाकडून दखल घेतली जाते का, चौकशी होते का आणि दोषींवर कारवाई केली जाते का, याकडे इगतपुरीसह नाशिक जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांच्या दारात अजिबात फिरकायचं नाही

दुष्काळी तालुक्यांमध्ये आणखी 43 तालुक्यांचा समावेश, राज्य सरकारचा मोठा निर्णय

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी : राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारने महाराष्ट्रातील 305 तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या ट्रिगर वन उपाययोजना लागू करण्याची घोषणा केली होती. सुरुवातीला सरकारने 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला होता. मात्र, अनेक तालुके दुष्काळाच्या मदतीपासून वंचित राहण्यावरुन राजकीय दबाव निर्माण झाल्यानंतर राज्य सरकारने दुष्काळी तालुक्यांच्या यादीत आणखी 43 तालुक्यांचा समावेश केला होता. यासोबतच राज्य सरकारने आता शेतकरी आणि पाण्याच्या नियोजनाच्याद्दष्टीने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय जाहीर केला होता. याशिवाय, राज्याचे महसूलमंत्री आणि दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही शेतकऱ्यांच्याद्दष्टीने एक महत्त्वाची घोषणा केली. दुष्काळात शेतकऱ्यांच्या दारी बँक किंवा पतसंस्थेचा कोणताही कर्मचारी जाता कामा नये, अशी सक्त ताकीद चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. यासाठी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले. याशिवाय, दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांची कर्जवसुली थांबवता येईल का, याबाबत रिझर्व्ह बँकेकडे विचारणा करण्याची सूचनाही बावनकुळे यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना केली.याशिवाय, दुष्काळी तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये, याद्दष्टीने महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दुष्काळी तालुक्यांमध्ये शहरी भागात 10 टक्के पाणी कपात लागू केली जाणार आहे. तसेच नवीन बांधकामांवर निर्बंध लादण्याच्याद्दष्टीने



चाचपणी सुरु आहे. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा याला प्राथमिकता दिली जाईल. गावतलाव आणि पाझर तलाव पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्याचा निर्णय दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकी घेण्यात आला. दुष्काळाच्या काळात गरीब शेतकरी आणि शेतमजूर यांना मोठा फटका बसू नये, यासाठी त्यांना गावात रोजगार उपलब्ध करुन देण्याच्याद्दष्टीने राज्य सरकारने पावले उचलली आहेत. त्यासाठी रोजगार हमी योजना विभागाने 6 हजार 728 कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. या माध्यमातून दुष्काळी भागात सिंचनाची कामे, गायगोठे, वैयक्तिक फळबाग लागवड , बोअरवेल पुर्नभरण, बांबू लागवड, प्रधानमंत्री आवास योजना, रेशीम उद्योगासाठी शेड, बांधकाम आणि कंपोस्ट खड्डयांचे बांधकाम, सार्वजनिक तलावांची दुरुस्ती अशाप्रकारची कामं हाती घेतली जाणार आहेत.राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारने महाराष्ट्रातील 305 तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या ट्रिगर वन उपाययोजना लागू करण्याची घोषणा केली होती. सुरुवातीला सरकारने 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला होता. मात्र, अनेक तालुके दुष्काळाच्या मदतीपासून वंचित राहण्यावरुन राजकीय दबाव निर्माण झाल्यानंतर राज्य सरकारने दुष्काळी तालुक्यांच्या यादीत आणखी 43 तालुक्यांचा समावेश केला होता. यासोबतच राज्य सरकारने आता शेतकरी आणि पाण्याच्या नियोजनाच्याद्दष्टीने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय जाहीर केला होता.अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही शेतकऱ्यांच्याद्दष्टीने एक महत्त्वाची घोषणा केली. दुष्काळात शेतकऱ्यांच्या दारी बँक किंवा पतसंस्थेचा कोणताही कर्मचारी जाता कामा नये, अशी सक्त ताकीद चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. यासाठी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले. याशिवाय, दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांची कर्जवसुली थांबवता येईल का, याबाबत रिझर्व्ह बँकेकडे विचारणा करण्याची सूचनाही बावनकुळे यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना केली.याशिवाय, दुष्काळी तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये, याद्दष्टीने महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दुष्काळी तालुक्यांमध्ये शहरी भागात 10 टक्के पाणी कपात लागू केली जाणार आहे. तसेच नवीन बांधकामांवर निर्बंध लादण्याच्याद्दष्टीने चाचपणी सुरु आहे. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा याला प्राथमिकता दिली जाईल. गावतलाव आणि पाझर तलाव पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्याचा निर्णय दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकी घेण्यात आला. दुष्काळाच्या काळात गरीब शेतकरी आणि शेतमजूर यांना मोठा फटका बसू नये, यासाठी त्यांना गावात रोजगार उपलब्ध करुन देण्याच्याद्दष्टीने राज्य सरकारने पावले उचलली आहेत. त्यासाठी रोजगार हमी योजना विभागाने 6 हजार 728 कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. या माध्यमातून दुष्काळी भागात सिंचनाची कामे, गायगोठे, वैयक्तिक फळबाग लागवड , बोअरवेल पुर्नभरण, बांबू लागवड, प्रधानमंत्री आवास योजना, रेशीम उद्योगासाठी शेड, बांधकाम आणि कंपोस्ट खड्डयांचे बांधकाम, सार्वजनिक तलावांची दुरुस्ती अशाप्रकारची कामं हाती घेतली जाणार आहेत.राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारने महाराष्ट्रातील 305 तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या ट्रिगर वन उपाययोजना लागू करण्याची घोषणा केली होती. सुरुवातीला सरकारने 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला होता. मात्र, अनेक तालुके दुष्काळाच्या मदतीपासून वंचित राहण्यावरुन राजकीय दबाव निर्माण झाल्यानंतर राज्य सरकारने दुष्काळी तालुक्यांच्या यादीत आणखी 43 तालुक्यांचा समावेश केला होता.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

प्रदीप पूर्णेकरांच्या मृत्यूने खळबळ; ठाकरे गटाच्या विभागप्रमुखांना 5 जणांनी संपवलं

जन सम्राट टाईम्स



ठाणे | प्रतिनिधी : ठाण्यातील मानपाडा परिसरात गोळीबार आणि धारदार शस्त्रांच्या हल्ल्यात शिवसेना ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेक यांची हत्या करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले असून 5 आरोपींचा सहभाग असल्याचा संशय आहे. सदर घटनेमुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. उर्वरित आरोपींच्या शोधासाठी क्राईम ब्रॉंच ,पोलिसांची 9 पथके तैनात करण्यात आली असून सीसीटीव्हीच्या साहाय्याने कापूरबावडी पोलीस अधिक तपास करत आहेत, अशी माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांनी दिली. दरम्यान, प्रदीप पूर्णेकर यांच्यावर झालेल्या गोळीबाराचा पहिला सीसीटीव्ही व्हिडीओही आता समोर आला आहे. या व्हिडीओमधून दोन व्यक्ती चेहऱ्याला रुमाल बांधून दुचाकीवरून प्रदीप पूर्णेकर यांच्या कार्यालयाच्या दिशेला जात असल्याचे दिसून येत आहे. निखिल यादव, पप्या शिंदे, आकाश निमसे, संतोष कनोजिया आणि एकजण अनोळखी असे एकूण 5 संशयित आरोपी आहेत. यामधील पप्या शिंदे, आकाश निमसे यांना पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले आहे. मीनाक्षी शिंदे आणि राजेंद्र शिंदे यांनी मारण्याची धमकी दिली होती. राजेंद्र शिंदे यांनी मिटिंग घेऊन हे सर्व केले, असा आरोप प्रदीप पुर्णेकर यांचा मुलगा राम पुर्णेकर यांनी केला आहे. वडिलांना न्याय मिळणार नाही तोपर्यंत इथून हलणार नाही. तर गणपतीपासून हे सर्व होते, ते रेकी करत होते, असा खळबळजनक दावा प्रदीप पुर्णेकर यांचे मोठे भाऊ जयनाथ पुर्णेकर यांनी केला आहे. पोलिसांनी क्लस्टरसारखे अँगेल तपासावे. तिघांना अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिली, असंही जयनाथ पुर्णेकरांनी सांगितले. ठाण्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप (बाळा) पूर्णेकर यांच्यावर दोन राऊंड गोळीबार झाला. गोळीबारामुळं पूर्णेकर जखमी झाल्यानंतर प्रकृती चिंताजनक असल्यानं रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, उपचारादरम्यान प्रदीप पूर्णेकर यांचा मृत्यू झाला. प्रदीप पूर्णेकर यांच्यावर मानपाडा या ठिकाणच्या त्यांच्या गणेश नगर येथील कार्यालयामध्ये हा प्राणघातक हल्ला झाला अशी माहिती आहे. तीन ते चार अज्ञात व्यक्तींनी प्रदीप पूर्णकर यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याची माहिती मिळतेय. प्रदीप पूर्णेकर यांच्यावर हल्ला नेमका कोणी केला? हल्ल्यामागील कारण काय? आणि मारेकरी नेमके कोण होते होते याचा छडा लावण्याचं काम आता पोलिसांवर आलं आहे. ठाण्यातील मानपाडा परिसरात गोळीबार आणि धारदार शस्त्रांच्या हल्ल्यात शिवसेना ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेक यांची हत्या करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले असून 5 आरोपींचा सहभाग असल्याचा संशय आहे. सदर घटनेमुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.

पोटच्या पोराच्या विक्री प्रकरणात धक्कादायक माहिती उघड!

विक्रीच्या पैशातून खरेदी केले सोने अन् ब्रँडेड स्मार्टफोन

जन सम्राट टाईम्स



छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी: पोटच्या अवघ्या एक महिन्याच्या चिमुकल्याचा १ लाख २० हजार रुपयांत सौदा करून, त्या पैशांमधून दोन ब्रँडेड स्मार्टफोन आणि ६२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने खरेदी करून मौजमजा केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. २४ सप्टेंबर रोजी उघडकीस आलेल्या या धक्कादायक बाळ विक्री प्रकरणात पोलिसांनी सखोल तपास करत जन्मदात्यांसह बाळाची हैदराबादपर्यंत तस्करी करणाऱ्या आंतरराज्यीय रॅकेटमधील तब्बल ७ आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. पोलिसांनी हैदराबादहून बाळाची सुरक्षित सुटका केली असून बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार एका संस्थेकडे सुपूर्द केले आहे. कौशल्या पवार आणि तिची मुलगी सीमा रेशवाल (दोघी रा. पस्तीशी, छ. संभाजीनगर) असे मुख्य मध्यस्थ आरोपींचे नाव आहे. तर संगीता आव्हाड (वय ३५, रा. पडगाव), गुंटूक व संगीता, स्वतःला डॉक्टर सांगणारा सुरेश राजाराम गुंटुका आणि उमा गंगाधर खटकमे (वय ४२, रा. तालागड, हैदराबाद) अशी इतर अटक आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या जोडीदारापासून विभक्त होऊन दोन वर्षांपासून लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या एका दाम्पत्याला ५ जुलै रोजी मुलगा झाला होता. दारूचे व्यसन आणि निर्दयीपणातून या दाम्पत्याने बाळाची विक्री केली. कौशल्या पवारने मुलगी सीमा रेशवालसोबत व्यवहार ठरवून ७ ऑगस्टला १.२० लाख रुपये रोख देऊन बाळाचा ताबा घेतला. यानंतर सीमाने हे बाळ नातेवाईक संगीता आव्हाडला २ लाख ७० हजारांत विकले. संगीताने नांदेड गाठून स्वतःला डॉक्टर सांगणाऱ्या सुरेश गुंटुका याच्यामार्फत ते बाळ थेट हैदराबाद येथील उमा खटकमे या महिलेला तब्बल ३ लाख ५० हजारांत विकले. ४८ तासांत हे बाळ चार हातांतून फिरत थेट तेलंगणात पोहोचले होते. कुटुंबाला आरोपी करण्याची धमकी देताच उघडले तोंड; मुकुंदवाडी पोलिसांत गुन्हा नोंद याप्रकरणी मुकुंदवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश्वर घुगे, अंमलदार राजाभाऊ कोल्हे, देविदास खेडकर यांनी सुरुवातीला जन्मदात्यांसह सीमा व कौशल्याला ताब्यात घेतले. पोलीस कोठडीत सीमा तोंड उघडत नव्हती; मात्र पोलिसांनी तिच्या संपूर्ण कुटुंबाला आरोपी करून अटकेची तयारी दाखवताच तिने गुन्ह्याची कबुली दिली. मुकुंदवाडी पोलिसांनी २४ सप्टेंबर रोजी स्वतः फिर्यादी होऊन गुन्हा दाखल केला.

पुणे महापालिकेतील नोकरभरती घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार अखेर जेरबंद

नोकरभरती घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार अखेर जेरबंद

जन सम्राट टाईम्स



पुणे । प्रतिनिधी: पुणे महापालिकेतील बहुचर्चित बनावट नोकरभरती घोटाळ्यात शिवाजीनगर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप असलेल्या राजेंद्र खेडेकरला पोलिसांनी अटक केली. महापालिकेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून शेकडो युवकांकडून कोट्यवधी रुपये उकळल्याचा आरोप त्याच्यावर आहे. दोन महिन्यांपासून फरार असलेल्या खेडेकरला अटक केल्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला 5 दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास सुरू आहे. नेमकं काय घडलं होतं? महापालिका प्रशासनाने केलेल्या प्राथमिक पडताळणीत बनावट नोकरभरतीचा प्रकार समोर आला होता. आरोपींकडून देण्यात आलेली नियुक्तीपत्रे बनावट असल्याचे तपासात स्पष्ट झाले. या नियुक्तीपत्रांवर महापालिकेचे चिन्ह आणि वॉटरमार्कचा बेकायदेशीर वापर करण्यात आला होता. तसेच महापालिकेचे उपायुक्त आणि इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या व शिक्के वापरून तरुणांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. नोकरी मिळणार असल्याच्या आशेने तरुणांची या माध्यमातून फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी गेल्या दोन महिन्यांपासून आरोपीचा शोध सुरु होता. अखेर फरार मुख्य आरोपी राजेंद्र खेडेकरला अटक करण्यात यश मिळालं आहे. एकूण किती गुन्हे? या प्रकरणी डॉ. राजेंद्र खेडेकर आणि त्याच्या टोळीविरोधात पुण्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये 3 स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्हे दाखल झाल्यानंतर मागील 2 महिन्यांपासून पोलीस आरोपींच्या शोधात होते. मात्र, आरोपी पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर शिवाजीनगर पोलिसांना आरोपीबाबत गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला आणि डॉ. राजेंद्र खेडेकर याला ताब्यात घेतले आहे. त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा तपास अधिक वेगाने सुरू करण्यात आला आहे. उद्देशाचा कसून तपास बनावट नियुक्तीपत्रे तयार करण्यामागे नेमका उद्देश काय होता, तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. आरोपींच्या माध्यमातून आणखी तरुणांची फसवणूक झाली आहे का, याचीही माहिती पोलीस घेत आहेत. पुढील तपासातून या प्रकरणातील आणखी बाबी समोर येण्याची शक्यता आहे.

हवालदाराच्या नावे लाच मागणाऱ्या खासगी इसमास अटक

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: भुसावळ तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक होण्याची भीती दाखवून, अटक टाळण्यासाठी पोलीस हवालदाराच्या नावे २० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या खासगी इसमास जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली आहे. अमन हसबिंदर सनसोये असे अटक करण्यात आलेल्या खासगी इसमाचे नाव आहे. एसीबीच्या पडताळणीत अमन सनसोये याने पोलीस हवालदार महेश चौधरी यांच्या नावे तक्रारदाराकडे २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याचे एसीबीने सांगितले. अटकेची भीती दाखवून पैशांची मागणी एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, भुसावळ तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यात तक्रारदारासह अन्य तीन जण अशा चौघांना अटक होण्याची भीती दाखवण्यात आली होती. या भीतीपोटी चौघांनी प्रत्येकी २५ हजार रुपये याप्रमाणे एकूण एक लाख रुपयांपैकी ५० हजार रुपये दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यानंतर तडजोडीअंती खासगी इसम अमन सनसोये याने पोलीस हवालदार महेश चौधरी यांच्या नावे तक्रारदाराकडे आणखी २० हजार रुपयांची लाच मागितली. तसेच ही रक्कम स्वीकारण्यास संमती दर्शवल्याचे एसीबीच्या पडताळणीत समोर आले. या प्रकरणी एसीबीने कारवाई करत अमन सनसोये याला अटक केली असून, प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. एसीबीच्या पथकाची कारवाई ही कारवाई डीवायएसपी तथा पर्यवेक्षक अधिकारी योगेश ठाकूर आणि सापळा अधिकारी तथा पोलीस निरीक्षक हेमंत नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

अल्पवयीन मुलीच्या छेडछाड प्रकरणी पॉक्सोसह ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल!

जन सम्राट टाईम्स



पारोळा| प्रतिनिधी: पारोळा तालुक्यातील पिंप्री परिसरात १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून छेडछाड केल्याचा तसेच सोशल मीडियावर तिचा बनावट फोटो तयार करून स्टेटसवर प्रसारित केल्याचा आरोप करत एका २२ वर्षीय तरुणाविरुद्ध पारोळा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS), पॉक्सो कायदा आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, सुमारे महिनाभरापूर्वी संबंधित अल्पवयीन विद्यार्थिनी शाळेतून पायी घरी जात असताना बोरी नदीच्या पुलाजवळ आरोपीने तिचा पाठलाग करून रस्ता अडविल्याचा आणि अश्लील स्वरूपाचे वक्तव्य केल्याचा आरोप आहे.

या प्रकारानंतर मुलीने घरी जाऊन पालकांना घटनेची माहिती दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.


इन्स्टाग्रामवर बनावट फोटो ठेवल्याचा आरोप

दरम्यान, २६ सप्टेंबर २०२६ रोजी गावातील एका व्यक्तीने मुलीच्या पालकांना संबंधित तरुणाने इन्स्टाग्रामवर मुलीचा आणि स्वतःचा बनावट फोटो तयार करून स्टेटसवर ठेवल्याची माहिती दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकारामुळे बदनामी करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. यानंतर मुलीने पालकांसह पारोळा पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी गुन्हा क्रमांक ०३५९/२०२६ नोंदविण्यात आल्याचे पोलिस तक्रारीत नमूद आहे. विविध कायद्यांन्वये गुन्हा पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात BNS कलम ७८, तसेच POCSO कायदा कलम १२ आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील संबंधित कलमांचा समावेश असल्याचे तक्रारीच्या माहितीत नमूद आहे. POCSO कायद्यानुसार लैंगिक हेतूने बालकाचा पाठलाग करणे, वारंवार संपर्क साधणे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून संपर्क करण्यासारख्या कृतींचा समावेश लैंगिक छळाच्या व्याख्येत होऊ शकतो. तक्रारीतील आरोपांच्या आधारे पोलिसांनी प्रकरणाची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. तपास डीवायएसपींकडे प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) विनायक कोते यांच्याकडे सोपविण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासादरम्यान स्पष्ट होणार असून, पोलिसांकडून सोशल मीडिया संबंधित पुरावे, तक्रारीतील घटनाक्रम आणि इतर उपलब्ध पुराव्यांची पडताळणी केली जाणार आहे.

जादूटोण्याची भीती दाखवत महिलेकडून सुमारे 1 लाख 60 हजार रुपये उकळले

मांत्रिक महिलेने 21 वर्षीय तरुणीशी स्वतःच्या मुलाचा साखरपुडा लावला, नाशकात अघोरी प्रकार

जन सम्राट टाईम्स



नाशिक । प्रतिनिधी : अघोरी पूजा, उतारे आणि जादूटोण्याची भीती दाखवत धुळे येथील एका महिलेकडून सुमारे १ लाख ६० हजार रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याशिवाय पीडित महिलेच्या २१ वर्षीय मुलीला कुटुंबापासून दूर ठेवून तिचा जबरदस्तीने मांत्रिकाच्या मुलाशी साखरपुडा केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या प्रकरणी नाशिक येथील संशयित मांत्रिक महिला सरिता मनोज जाधव आणि तिच्या साथीदारांविरोधात धुळे शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी संबंधित संशयितांना नाशिक येथून अटक केली आहे. फिर्यादीनुसार, पीडित महिला धुळे येथे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. प्रकृती वारंवार बिघडत असल्याने आणि आर्थिक अडचणींमुळे ती चिंतेत होती. तिच्या दोन परिचित महिलांनी तिची नाशिकहून आलेल्या सरिता मनोज जाधव या महिलेशी ओळख करून दिली.

जाधव हिने स्वतःकडे अघोरी पूजा व उतारे करण्याची शक्ती असल्याचे सांगत पीडित महिलेचा विश्वास संपादन केला. जम्मू-काश्मीरच्या सी आ य ए स ए फ कॅम्प म ध्ये जवानाचा आपल्याच सहकाऱ्यांवर गोळीबार, चार सैनिकांचा मृत्यू लोहगडावरील पर्यटकाच्या फोटोत अनवधानाने सगळेच कैद झाले, केतन-सियासोबत चेतनही बॅकग्राऊण्डला, 5300 पानी चार्जशीटसोबत मोठा पुरावा मला तुझा राग आलाय, कलाकारांच्या ढोलताशा पथकावर प्रश्न, विद्याधर जोशींना श्रुती मराठे-अभिजीत केळकरचं प्रत्युत्तर रॅपिडो बाईकने जाताना बसची धडक, 28 वर्षीय विद्यार्थिनीचा करुण अंत, कुटुंबापासून दूर राहून शिक्षण घेताना काळाचा घाला पीडित महिलेला अघोरी पूजेस भाग पाडले पीडित महिलेच्या अंगावरून लिंबू फिरवणे, पाण्यात राख टाकून ते पिण्यास सांगणे, पेढा खायला देणे, तसेच "माझे सांगणे पाळले नाही तर आणखी वाईट होईल," अशी भीती दाखवल्याचा आरोप आहे. त्यानंतर पीडितेच्या डोक्यातील केस उपटून स्मशानात पूजा करावी लागेल, असे सांगत नाशिक येथे अमावास्या आणि पौर्णिमेला उतारे करण्यासाठी बोलावण्यात आले. या विधीसाठी संशयित महिलेने १ लाख ५१ हजार रुपयांची मागणी केली. त्यापैकी पीडित महिलेने काही दिवसांनी १ लाख ३० हजार रुपये रोख दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यासह अमावस्येच्या दिवशी पीडित महिलेला नाशिकच्या गंगाघाटाजवळील केवडीबन येथे नेण्यात आले. तेथे स्नान घालून लिंबू उतरवण्यात आला. त्या लिंबाचा रस डोळ्यात टाकण्यात आला. खोबरे व पेढा खायला दिल्यानंतर पीडितेला मळमळ व उलटी झाल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानंतर तिला मुंबई नाका परिसरातील घरी नेऊन काळे तीळ आणि राखेच्या सहाय्याने अघोरी पूजा करण्यात आली. या वेळी आणखी ३० हजार रुपये जबरदस्तीने घेतल्याचा आरोप आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

मंत्री झिरवाळ आणि बिडवई यांना शेतकऱ्यांचा घेराव!

निफाड साखर कारखाना प्रकरणासह शेतकऱ्यांच्या अन्य प्रश्नांवर सभेत सविस्तर चर्चा व्हावी अशी मागणी

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: नाशिक जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेत राडा झाल्याची माहिती मिळत आहे. या सभेत आपल्या मुद्द्यांवर चर्चा न झाल्याचा दावा करत शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. या सभेत शेतकरी प्रचंड आक्रमक झाले. शेतकऱ्यांकडून सभेतच अभूतपूर्व गोंधळ घालण्यात आला. शेतकरी इतके आक्रमक झाले होते की, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, प्रशासक संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांचा सभेतच घेराव घातला. तसेच त्यांना धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न झाल्याची देखील माहिती समोर येत आहे. सभेत झालेला गदारोळ पाहता पोलिसांनी मध्यस्थी केली. पोलिसांच्या बंदोबस्तात नरहरी झिरवाळ यांना सभेतून बाहेर काढण्यात आलं. यानंतर शेतकऱ्यांनी प्रशासक संतोष बिडवई यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही शेतकऱ्यांनी बिडवाई यांना धक्काबुक्कीचा प्रयत्न केल्याचा दावा केला जातोय. तणावाची परिस्थिती पाहता मंत्री नरहरी झिरवाळ आणि प्रशासन संतोष बिडवई यांनी तिथूना काढता पाय घेतला. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्वसाधारण सभेत सोमवारी शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत जोरदार गोंधळ घातला.



शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी राष्ट्रगीत म्हणत सभा गुंडाळण्यात आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी सभेतच आक्रमक पवित्रा घेतला. या प्रकारामुळे सभास्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. शेतकऱ्यांची भूमिका काय? निफाड साखर कारखान्यातील कथित घोटाळ्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली होती. मात्र, या विषयावर चर्चा न झाल्याने शेतकरी संतप्त झाले. विविध प्रश्न मांडल्यानंतरही त्यावर चर्चा न करता सभा गुंडाळली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. राष्ट्रगीत सुरू झाल्यानंतरही शेतकऱ्यांनी आपला आक्षेप नोंदवत घोषणाबाजी केली. झिरवाळ आणि बिडवई यांना घेराव दरम्यान, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ आणि बँकेचे प्रशासक संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांनी सभेतच घेराव घातला. यावेळी दोघांनाही धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगण्यात आले. परिस्थिती चिघळत असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी हस्तक्षेप केला. पोलीस बंदोबस्तात मंत्री झिरवाळ यांना सभास्थळातून बाहेर काढण्यात आले. पोलिसांनी आणली परिस्थिती नियंत्रणात यानंतर प्रशासक संतोष बिडवई यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न संतप्त शेतकऱ्यांनी केला. बिडवई यांच्यासोबतही धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती आहे. त्यामुळे पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. निफाड साखर कारखाना प्रकरणासह शेतकऱ्यांच्या अन्य प्रश्नांवर सभेत सविस्तर चर्चा व्हावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी लावून धरली. मात्र, चर्चा न करताच सभा संपवण्यात आल्याने शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला. अखेर मंत्री झिरवाळ आणि प्रशासक बिडवई यांनी परिस्थिती पाहता सभास्थळ सोडले. या घटनेमुळे जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेत शेतकरी प्रश्नांवरून निर्माण झालेला संघर्ष चांगलाच उफाळून आला आहे. नाशिक जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेत राडा झाल्याची माहिती मिळत आहे. या सभेत आपल्या मुद्द्यांवर चर्चा न झाल्याचा दावा करत शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. या सभेत शेतकरी प्रचंड आक्रमक झाले. शेतकऱ्यांकडून सभेतच अभूतपूर्व गोंधळ घालण्यात आला. शेतकरी इतके आक्रमक झाले होते की, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, प्रशासक संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांचा सभेतच घेराव घातला. तसेच त्यांना धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न झाल्याची देखील माहिती समोर येत आहे. सभेत झालेला गदारोळ पाहता पोलिसांनी मध्यस्थी केली. पोलिसांच्या बंदोबस्तात नरहरी झिरवाळ यांना सभेतून बाहेर काढण्यात आलं. यानंतर शेतकऱ्यांनी प्रशासक संतोष बिडवई यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही शेतकऱ्यांनी बिडवाई यांना धक्काबुक्कीचा प्रयत्न केल्याचा दावा केला जातोय. तणावाची परिस्थिती पाहता मंत्री नरहरी झिरवाळ आणि प्रशासन संतोष बिडवई यांनी तिथूना काढता पाय घेतला. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्वसाधारण सभेत सोमवारी शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत जोरदार गोंधळ घातला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी राष्ट्रगीत म्हणत सभा गुंडाळण्यात आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी सभेतच आक्रमक पवित्रा घेतला. या प्रकारामुळे सभास्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. शेतकऱ्यांची भूमिका काय? निफाड साखर कारखान्यातील कथित घोटाळ्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली होती. मात्र, या विषयावर चर्चा न झाल्याने शेतकरी संतप्त झाले. विविध प्रश्न मांडल्यानंतरही त्यावर चर्चा न करता सभा गुंडाळली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. राष्ट्रगीत सुरू झाल्यानंतरही शेतकऱ्यांनी आपला आक्षेप नोंदवत घोषणाबाजी केली. झिरवाळ आणि बिडवई यांना घेराव दरम्यान, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ आणि बँकेचे प्रशासक संतोष बिडवई यांना शेतकऱ्यांनी सभेतच घेराव घातला. यावेळी दोघांनाही धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगण्यात आले. परिस्थिती चिघळत असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. निफाड साखर कारखाना प्रकरणासह शेतकऱ्यांच्या अन्य प्रश्नांवर सभेत सविस्तर चर्चा व्हावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी लावून धरली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जुन्या वादातून मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप



जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी आनंदखेडे (खेडे) येथील जयवंत ऊर्फ धरम दादाभाऊ गवळे यांनी जुन्या वादातून मारहाण तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करत आनंद दिलीप अमृतसागर आणि दिलीप वामन अमृतसागर यांच्याविरोधात अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे. संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करून आपल्या कुटुंबाला संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. निवेदनात गवळे यांनी नमूद केल्यानुसार, ९ सप्टेंबर २०२३ रोजी संबंधित दोघांनी अन्य काही व्यक्तींच्या मदतीने मोरणे परिसरात त्यांना अडवून लोखंडी पाइप व धारदार शस्त्राने मारहाण केली होती. या घटनेत डोक्याला, पाठीला, पोटाला आणि हाताला दुखापत झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, २५ सप्टेंबर २०२६ रोजी आनंद अमृतसागर यांनी मोबाईलवरून पुन्हा शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप गवळे यांनी केला आहे. संबंधित संभाषणाचे रेकॉर्डिंग आपल्याकडे असल्याचाही दावा त्यांनी निवेदनातून केला आहे. यासंदर्भात धुळे तालुका पोलीस ठाण्यात अदखलपात्र तक्रार नोंदविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले आहे. कुटुंबाच्या सुरक्षेची मागणी संबंधित व्यक्तींकडून आपली आई, पत्नी, मुलगी आणि संपूर्ण कुटुंबाच्या जीविताला धोका असल्याची भीती जयवंत गवळे यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी तसेच आपल्या कुटुंबाला आवश्यक पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्याकडे केली आहे. दरम्यान, या निवेदनातील आरोपांबाबत संबंधित आनंद अमृतसागर व दिलीप अमृतसागर यांची बाजू उपलब्ध झालेली नाही. पोलिसांकडून तक्रारीची चौकशी व त्यानुसार पुढील कार्यवाही काय होते, याकडे लक्ष लागले आहे. आनंदखेडे (खेडे) येथील जयवंत ऊर्फ धरम दादाभाऊ गवळे यांनी जुन्या वादातून मारहाण तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करत आनंद दिलीप अमृतसागर आणि दिलीप वामन अमृतसागर यांच्याविरोधात अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे. संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करून आपल्या कुटुंबाला संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. निवेदनात गवळे यांनी नमूद केल्यानुसार, ९ सप्टेंबर २०२३ रोजी संबंधित दोघांनी अन्य काही व्यक्तींच्या मदतीने मोरणे परिसरात त्यांना अडवून लोखंडी पाइप व धारदार शस्त्राने मारहाण केली होती. या घटनेत डोक्याला, पाठीला,

---

देवीच्या चांदीच्या मूर्ती चोरीप्रकरणी पारोळा पोलिस ठाण्याबाहेर उपोषण

ग्रामस्थांची चोरट्यांचा शोध घेऊन अटकेची मागणी!

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी : तालुक्यातील लोणीसिम येथील 'श्री कोकण माता' देवी मंदिरातील चांदीच्या मूर्ती चोरीप्रकरणी आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा आणि त्यांना अटक करावी, या मागणीसाठी लोणीसिम येथील महिला व पुरुष ग्रामस्थांनी पारोळा पोलिस ठाण्याच्या आवारात उपोषण सुरू केले. या उपोषणाची माहिती मिळाल्यानंतर भाजप विधानसभा क्षेत्रप्रमुख तथा नगराध्यक्ष गोविंद शिरोळे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. त्यांनी ग्रामस्थांच्या मागण्यांची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार उल्हास देवरे तसेच पारोळा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांची भेट घेऊन मंदिरातील मूर्ती चोरीच्या घटनेची सखोल चौकशी करून



संशयितांचा शोध घेण्याची मागणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी घटनेचा तपास करून संशयितांचा शोध घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे तसेच लवकरात लवकर आरोपींचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. उपोषणस्थळी नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष सुरेंद्र बोहरा, जळगाव जिल्हा दूध संघाचे संचालक पराग मोरे, भाजप तालुकाध्यक्ष अतुल पवार तसेच पारोळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मनोराज पाटील यांची उपस्थिती होती. दरम्यान, मंदिरातील चांदीच्या मूर्ती चोरीच्या या प्रकरणाचा तपास कोणत्या दिशेने जातो आणि पोलिसांकडून संशयितांना कधी ताब्यात घेतले जाते, याकडे लोणीसिम ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. तालुक्यातील लोणीसिम येथील 'श्री कोकण माता' देवी मंदिरातील चांदीच्या मूर्ती चोरीप्रकरणी आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा आणि त्यांना अटक करावी, या मागणीसाठी लोणीसिम येथील महिला व पुरुष ग्रामस्थांनी पारोळा पोलिस ठाण्याच्या आवारात उपोषण सुरू केले. या उपोषणाची माहिती मिळाल्यानंतर भाजप विधानसभा क्षेत्रप्रमुख तथा नगराध्यक्ष गोविंद शिरोळे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला.

भारतीय बौद्ध महासभेच्या जामखेड तालुका अध्यक्षपदी संतोष मोरे

जन सम्राट टाईम्स

जामखेड। (प्रतिनिधी): भारतीय बौद्ध महासभा शाखा जामखेड तालुका कार्यकारिणीच्या पुनर्गठनासाठी आयोजित महत्त्वपूर्ण बैठक रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी जामखेड शहरातील सदाफुले जिल्हा परिषद शाळेत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत संतोष मोरे यांची जामखेड तालुका अध्यक्षपदी, तर अनिल सदाफुले यांची जामखेड शहर अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तालुका कार्यकारिणीत सरचिटणीसपदी बाळासाहेब ससाने आणि कोषाध्यक्षपदी राजेंद्र धनवे यांची निवड झाली. तसेच शहर कार्यकारिणीत सरचिटणीसपदी अशोक घोडेस्वार आणि कोषाध्यक्षपदी जालिंदर यादव यांची निवड करण्यात आली. बैठकीस महासभेचे जिल्हा पदाधिकारी, तालुका कार्यकारिणी सदस्य, बौद्धाचार्य, केंद्रीय शिक्षक व शिक्षिका, समता सैनिक दलाचे सैनिक तसेच उपासक-उपासिका मोठ्या संख्येने



उपस्थित होते. धम्मप्रचाराला गती देण्याचा संकल्प संघटनेची कार्यक्षमता वाढविणे, धम्म प्रचार-प्रसार अधिक गतिमान करणे तसेच तळागाळातील समाजापर्यंत बौद्ध धम्माचे विचार पोहोचविण्याच्या उद्देशाने कार्यकारिणीचे पुनर्गठन करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. बैठकीस भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी साळवे, सरचिटणीस सतीश ओहोळ, कोषाध्यक्ष विजय हूसळे, प्रचार व पर्यटन विभागाचे प्रमुख पंडित मोरे, कार्यालयीन सचिव गौतम पाचरणे, संरक्षण विभागाचे सचिव तथा समता सैनिक किशोर कांबळे, महिला जिल्हा सरचिटणीस सुरेखाताई सदाफुले, महिला जिल्हा संघटक उषाताई मोरे, अरुणाताई सदाफुले तसेच महिला तालुका अध्यक्ष अर्चना थोरात उपस्थित होत्या. याशिवाय अरणगाव, खर्डा, वाघा, डोणगाव, घोडेगाव, नान्नज, पाटोदा तसेच जामखेड शहरातील भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुद्धवंदनेने कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर त्रिसरण पंचशील घेण्यात आले.

पारोळा तालुक्यातील ४ 'कोतवाल' पदांसाठी आरक्षण जाहीर!

तहसील कार्यालयात चिठ्ठीद्वारे महिला आरक्षण सोडत; १ ओबीसी महिला व १ सर्वसाधारण महिला पद निश्चित

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: पारोळा तालुक्यातील विविध महसूल सजांमध्ये रिक्त असलेल्या महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील चार पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाच्या बिंदूनामावलीनुसार या पदांसाठी आरक्षण निश्चित करण्यासाठी सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता पारोळा तहसील कार्यालयात चिठ्ठीद्वारे महिला आरक्षण सोडत काढण्यात आली. एरंडोल महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी मनीषकुमार गायकवाड यांनी आरक्षण सोडतीची माहिती दिली. महसूल विभागाच्या निर्देशानुसार जळगाव जिल्हाधिकाऱ्यांकडून पारोळा तालुक्यातील कोतवाल संवर्गाची बिंदूनामावली मंजूर करण्यात आली आहे. चारही पदे सरळसेवेने भरणार



मंजूर बिंदूनामावलीनुसार पारोळा तालुक्यातील रिक्त असलेली चारही पदे १०० टक्के सरळसेवेने भरण्यात येणार आहेत. उपलब्ध माहितीनुसार आरक्षण सोडतीत १ ओबीसी सर्वसाधारण, १ सर्वसाधारण आणि महिलांसाठी २ पदे निश्चित करण्यात आली. महिलांच्या ३० टक्के आरक्षणानुसार चिठ्ठीद्वारे १ ओबीसी महिला आणि १ सर्वसाधारण महिला अशी दोन पदे निश्चित करण्यात आली आहेत. महिला आरक्षण निश्चित करण्यासाठी तहसील कार्यालयात शासकीय पद्धतीने चिठ्ठीद्वारे सोडत प्रक्रिया पार पडली. त्यानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांनी आरक्षणाची माहिती जाहीर केली. या महसूल सजांचा समावेश कोतवाल पदांच्या भरती प्रक्रियेत पुढील चार महसूल सजांचा समावेश आहे : १. पारोळा सजा : पारोळा शहर २. शेवगे बु. सजा : बोदर्डे, शेवगे बु., पुनगाव ३. टोळी सजा : टोळी, मोंढाळे प्र. उ., पिंपरी प्र. उ. ४. सावखेडे मराठ सजा : सावखेडे होळ, सावखेडे मराठ, सावखेडे तुर्क, कन्हेरे या चारही सजांमधील कोतवाल पदांसाठी आरक्षण सोडत प्रक्रिया शासकीय नियमानुसार चिठ्ठ्या टाकून पार पाडण्यात आली. यावेळी तहसीलदार उल्हास देवरे, नायब तहसीलदार अनिल पाटील, संबंधित आस्थापना विभागाचे कर्मचारी तसेच दगडू पवार सर, सुरेश पाटोळे, योगेश राजपूत, प्रविण पाटील यांच्यासह संबंधित महसूल सजांमधील नागरिक उपस्थित होते.

प्राचार्य संघशिल भद्रे यांचा वाढदिवस विधायक उपक्रमाने साजरा

वाढदिवसाचा आनंद शुभेच्छांपुरता न ठेवता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व प्रात्यक्षिक गरजांना हातभार

जन सम्राट टाईम्स

पुणे। प्रतिनिधी: नांदेड जिल्ह्यातील कोमलाबाई मुंडे नर्सिंग इन्स्टिट्यूटचे प्राचार्य संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर यांचा वाढदिवस यंदा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आणि विधायक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. २९ सप्टेंबर रोजी वाढदिवसानिमित्त संस्थेतील नर्सिंग विद्यार्थ्यांना मेडिकल किटचे वाटप करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच प्रात्यक्षिक प्रशिक्षणाला आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे. वाढदिवस म्हटला की शुभेच्छा, सत्कार आणि उत्सव हे चित्र सर्वसाधारणपणे पाहायला मिळते. मात्र, विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी उपयोगी ठरणाऱ्या उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय घेतल्याने या उपक्रमाला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या व्यावहारिक ज्ञानाला चालना देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

प्रात्यक्षिक प्रशिक्षणाला मिळणार बळ

नर्सिंग अभ्यासक्रमामध्ये केवळ पुस्तकी ज्ञानाला नव्हे, तर प्रत्यक्ष प्रशिक्षणालाही विशेष महत्त्व आहे. रुग्णसेवेशी संबंधित विविध कौशल्ये आत्मसात करताना विद्यार्थ्यांना आवश्यक उपकरणे आणि साहित्याचा प्रत्यक्ष वापर करता येणे गरजेचे असते. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना मेडिकल किट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या किटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षणादरम्यान आवश्यक साहित्याचा वापर करण्याची संधी मिळणार आहे. त्यातून त्यांच्या व्यावहारिक कौशल्यांसोबत शिस्त, सेवाभाव, जबाबदारी आणि रुग्णांप्रती संवेदनशीलता विकसित होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांना प्राधान्य प्राचार्यपदाची नवी जबाबदारी स्वीकारल्यानंतर संघशिल भद्रे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व देण्याचा दृष्टिकोन ठेवला आहे. शिक्षण घेत



असताना विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा, मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक अनुभव मिळणे ही त्यांच्या भविष्यातील व्यावसायिक वाटचालीसाठी महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मेडिकल किट देण्याचा उपक्रम हा केवळ भेटवस्तू देण्यापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या भविष्यातील आरोग्यसेवा क्षेत्रातील योगदानासाठी आवश्यक कौशल्यांना चालना देणारा उपक्रम ठरणार आहे. विविध क्षेत्रांत सक्रिय योगदान संघशिल भद्रे हे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, कवी, लेखक, पत्रकार तसेच संविधान अभ्यासक म्हणून विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. सामाजिक व शैक्षणिक विषयांबाबत सातत्याने काम करणाऱ्या भद्रे यांनी आता प्राचार्य म्हणून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत योगदान देण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. नर्सिंग क्षेत्रात शिक्षण घेणारे विद्यार्थी भविष्यात रुग्णालये, आरोग्य केंद्रे आणि विविध आरोग्यसेवा संस्थांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रशिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच सेवाभाव, शिस्त आणि व्यावसायिक जबाबदारीची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. या उद्देशाने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविण्यावर भर दिला जाणार आहे. वाढदिवसाला सामाजिक योगदानाची जोड स्वतःच्या वाढदिवसाचा आनंद विद्यार्थ्यांसोबत वाटून घेत त्यांच्या शिक्षणासाठी उपयुक्त साहित्य उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम 'वाढदिवस साजरा करण्याची विधायक पद्धत' म्हणून पाहिला जात आहे. शुभेच्छा आणि सत्कारापलीकडे जाऊन विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीला हातभार लावण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे.

बोदवडच्या तीन खेळाडूंची राज्यस्तरीय तायक्वांदोसाठी निवड

जन सम्राट टाईम्स

बोदवड। प्रतिनिधी: क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच नाशिक विभागीय जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धा २०२६-२७ मध्ये बोदवडच्या तीन खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर तिन्ही खेळाडूंची राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत पार्थ संदीप माळी (सर सत्यजित नेमाडे हायस्कूल, बोदवड), सोहम गिरधर कोल्हे (एन. एच. रांक हायस्कूल, बोदवड) आणि विवेक भगतसिंग तोरे (जी. जे. राजपूत हायस्कूल, बोदवड) यांनी आपल्या कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. तिघांनीही दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविल्याने त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. प्रशिक्षक व क्रीडा क्षेत्रातून अभिनंदन या यशाबद्दल पँथर तायक्वांदो अकॅडमी, बोदवडचे प्रशिक्षक निकेतन भिमराव खोडके व गिरीश भिमराव खोडके, संबंधित शाळांचे क्रीडा शिक्षक तसेच जळगाव जिल्हा तायक्वांदो संघटनेचे सचिव अजित घारगे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच संघ प्रशिक्षक जयेश बाविस्कर, जयेश कासार, पुष्पक महाजन, श्रेयांग खेकारे, दानिश तडवी यांच्यासह खेळाडू व क्रीडाप्रेमींनी तिन्ही खेळाडूंच्या यशाचे कौतुक करत आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तिन्ही खेळाडूंनी मिळविलेल्या या यशामुळे बोदवडच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी विविध स्तरांतून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

घरफोडी करणाऱ्या कुख्यात भादा टोळीचा पर्दाफाश; 12 गुन्हे उघडकीस!

सात जण ताब्यात; पिस्तुल, मॅग्झीन, जिवंत काडतुसे व १८.७८ लाखांचा सोन्या-चांदीचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: धुळे ग्रामीण भागात बंद घरांचे कुलूप व कडी-कोयंडे तोडून घरफोड्या करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या कारवाईत मुख्य सूत्रधारासह सात जणांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्या चौकशीत धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तब्बल १२ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. कारवाईदरम्यान पिस्तुल, मॅग्झीन, जिवंत काडतुसे, कटर तसेच सुमारे १८ लाख ७८ हजार ९९० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. नेर येथील घरफोडीनंतर तपासाला वेग तालुक्यातील नेर येथील रहिवासी व सेवानिवृत्त सुभेदार मेजर अनिल आनंदा सूर्यवंशी यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी पिस्तुल, १२ राऊंड, रोख रक्कम तसेच सोन्याची वीट व अंगठी चोरी केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात घरफोडी व चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संशयितांची माहिती मिळवून फत्तेसिंग मिलनसिंग भादा, रा. दंडेवाले बाबा नगर, मोहाडी उपनगर, धुळे याला ताब्यात घेतले. पोलिसांच्या माहितीनुसार, त्याची अंगझडती घेतली असता कट्यार, पिस्तुल, मॅग्झीन आणि आठ जिवंत काडतुसे आढळून आली. चौकशीदरम्यान त्याने साथीदारांच्या मदतीने केलेल्या घरफोड्यांची तसेच चोरीचा मुद्देमाल विक्रीसाठी केलेल्या व्यवहारांची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले.



टोळीतील संशयितांची नावे तपासात समोर पोलिसांच्या तपासात मुख्य सूत्रधार फत्तेसिंग मिलनसिंग भादा याच्यासह चॅम्पीयनसिंग मिलनसिंग भादा, त्याचा अल्पवयीन भाऊ, मनजितसिंग जनरलसिंग सरदार, सुरेश बबन लोंढे (२३), किरण रामदास राखपसरे (३०) तसेच किरण बन्सीलाल देवरे (५८) यांची नावे समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. यापैकी सुरेश लोंढे हा चोरीचा माल विक्रीसाठी मदत करत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. किरण रामदास राखपसरे हा पाचोरा येथील रहिवासी असून सध्या धुळे येथे राहत असल्याची माहिती देण्यात आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, पाचोरा येथील सराफ व्यावसायिक किरण बन्सीलाल देवरे याच्याकडून चोरीचे सोने-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले. चोरीचा माल असल्याची माहिती असूनही दागिने कोणत्याही पावती अथवा बिलाशिवाय खरेदी केल्याचा आरोप तपासात समोर आला आहे.

१८ लाख ७८ हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सराफ व्यावसायिकाकडून १७ लाख ६ हजार ६१० रुपये किमतीचे १०४.७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच १ लाख ७२ हजार ३८० रुपये किमतीचे ८५.६ भार वजनाचे चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. या सोन्या-चांदीच्या दागिन्यांची एकूण किंमत १८ लाख ७८ हजार ९९० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. २०२५ मधील १२ घरफोडीचे गुन्हे उघड या टोळीच्या चौकशीत धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सन २०२५ मधील तब्बल १२ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आल्याचे पोलिसांनी सांगितले. नवलंबे, आमदड, तरवाडे, मोराणे, कुंडाणे, मिनाई कॉलनी, पांडवनगर-नेर, विचूर, अंजन, वरखेडी आदी भागांत या घरफोड्या झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. हद्दपारीनंतरही गुन्हेगारी सुरू असल्याचा पोलिसांचा दावा

मुख्य संशयित फत्तेसिंग मिलनसिंग भादा याच्याविरुद्ध मोहाडी तसेच इतर पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांच्या माहितीनुसार, फत्तेसिंग भादा, त्याचा भाऊ चॅम्पीयनसिंग आणि आई बरसातकौर यांना जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या आदेशानुसार ११ ऑगस्ट २०२५ पासून एक वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते. मात्र, हद्दपारीच्या आदेशानंतरही गुन्हेगारी कारवाया सुरू ठेवल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. या कारवाईमुळे धुळे ग्रामीण भागातील घरफोडीच्या मालिकेतील अनेक गुन्ह्यांचा तपास पुढे जाण्यास मदत झाली असून, टोळीशी संबंधित आणखी काही बाबींचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक धोके, पोलीस उपनिरीक्षक अमरसिंग मोरे, तसेच अमित माळी, धनंजय मोरे, शाम निकम आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या इतर पोलीस अंमलदारांच्या पथकाने केली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

शासकीय आश्रमशाळा गमन येथे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



जन सम्राट टाईम्स

धडगाव | प्रतिनिधी: अक्कलकुवा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र जांगठी अंतर्गत येणाऱ्या गमन उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रातील शासकीय आश्रमशाळा, गमन (सध्या भगदरी) येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात शाळेतील मुला-मुलींची सखोल शारीरिक व आरोग्य तपासणी करण्यात आली. आरोग्य तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांची सामान्य आरोग्य तपासणी, उंची-वजन, हिमोग्लोबिन, ॲनिमिया, डोळे, दात तसेच आवश्यक इतर वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. तपासणीमध्ये आरोग्यविषयक समस्या आढळलेल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय पथकाकडून आवश्यक उपचार तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले. ज्या विद्यार्थ्यांना पुढील उपचार किंवा अधिक तपासणीची आवश्यकता आहे, अशा विद्यार्थ्यांना पुढील वैद्यकीय सेवेसाठी संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक समस्या वेळेत ओळखून त्यावर आवश्यक उपाययोजना करण्यास मदत झाली. वैद्यकीय पथकाचे विशेष परिश्रम आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी करण्यासाठी मानसेवी वैद्यकीय अधिकारी डॉ. दाजला वसावे, डॉ. संदीप पाडवी, आरोग्य सहाय्यक ज्ञानदेव वीर, ए.एन.एम. गीता वसावे, एम.पी.डब्ल्यू. योगेश डी. पाडवी आणि दिलीप राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराच्या आयोजनासाठी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षकवृंदाने मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी व वेळेवर उपचार मिळण्यासाठी अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले.अक्कलकुवा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र जांगठी अंतर्गत येणाऱ्या गमन उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रातील शासकीय आश्रमशाळा, गमन (सध्या भगदरी) येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात शाळेतील मुला-मुलींची सखोल शारीरिक व आरोग्य तपासणी करण्यात आली. आरोग्य तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांची सामान्य आरोग्य तपासणी, उंची-वजन, हिमोग्लोबिन, ॲनिमिया, डोळे, दात तसेच आवश्यक इतर वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. तपासणीमध्ये आरोग्यविषयक समस्या आढळलेल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय पथकाकडून आवश्यक उपचार तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले.

मैत्रेय बुद्ध विहारात राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे चौदावे पुष्प संपन्न

'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोधिसत्व कसे?'

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी: नालंदा नगर, भुसावळ येथील मैत्रेय बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व महिला शाखेच्या वतीने आयोजित राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे चौदावे पुष्प उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांनी सामुदायिक त्रिशरण व पंचशील ग्रहण केले. यावेळी आयु. जयपाल धुरंधर गुरुजी, बौद्धाचार्य तथा जळगाव तालुका सचिव, यांनी 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोधिसत्व कसे?' या विषयावर उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला भारतीय बौद्ध महासभा महिला शाखा, जळगाव जिल्हा पूर्वच्या अध्यक्ष आदरणीय प्रियंका ताई अहिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. बोधिसत्वाच्या संकल्पनेवर सखोल विवेचन प्रवचनादरम्यान जयपाल धुरंधर गुरुजी यांनी बोधिसत्व संकल्पनेचे विविध पैलू स्पष्ट केले. बोधिसत्व म्हणजे बुद्धत्व प्राप्त करण्याच्या मार्गावर असलेली व्यक्ती; जी केवळ



स्वतःच्या प्रगतीचा विचार न करता इतर प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी आणि दुःखमुक्तीसाठी कार्य करण्याचा संकल्प करते, असे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा संदर्भ देत त्यांनी बाबासाहेबांनी दहा पारमितांचे आचरण आपल्या कार्यातून कशा प्रकारे अधोरेखित केले, याची विविध उदाहरणे देऊन सोप्या भाषेत मांडणी केली. त्यांच्या मार्गदर्शनातून उपस्थितांना बौद्ध धम्मातील बोधिसत्व संकल्पना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा संबंध समजावून सांगण्यात आला. महिला शाखेच्या पदाधिकाऱ्यांसह उपासक-उपासिकांची उपस्थिती या मंगल प्रसंगी आयु. नी. सीमाताई अहिरे (केंद्रीय शिक्षिका), आयु. राजरत्न अहिरे, घायतडक ताई, प्रतिभाताई शिरतुरे, सुजाताई जंजाळ, अनुसयाबाई अहिरे, प्रभाताई जाधव, वर्षाताई जाधव, शिवानीताई घायतडक, अश्विनीताई जाधव, गायकवाड ताई, सोनवणे ताई, वैजयंता बाई कदम यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने शील, श्रद्धावान उपासक-उपासिका तसेच बालक व बालिका उपस्थित होत्या. धम्म प्रवचनामुळे विहार परिसरात मंगलमय आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रियंका ताई अहिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सीमाताई अहिरे यांनी मानले. उपस्थितांच्या सहभागाने राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे चौदावे पुष्प उत्साहात संपन्न झाले.

रिंगणगावच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात लॅब सेवा अडचणीत!

जन सम्राट टाईम्स

एरंडोल। (प्रतिनिधी): ग्रामीण भागातील सर्वसामान्य आणि गरीब रुग्णांसाठी महत्त्वाचा आधार असलेल्या रिंगणगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळा सेवा सध्या अडचणीत सापडली आहे. लॅब टेक्निशियन उपलब्ध नसल्याने रुग्णांच्या रक्त तपासण्या आणि अन्य आवश्यक प्रयोगशाळा चाचण्यांचा प्रश्न निर्माण झाला असून, तपासण्यांसाठी रुग्णांना बाहेरील प्रयोगशाळांचा आधार घ्यावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत. विशेष म्हणजे, गेल्या दीड ते दोन महिन्यांच्या कालावधीत तीन कंत्राटी लॅब टेक्निशियनांनी काम सोडल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे टेक्निशियनची नियुक्ती होते, काही दिवस सेवा सुरू राहते आणि त्यानंतर पुन्हा पद रिक्त होते, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तुटपुंज्या मानधनामुळे कर्मचारी टिकत नसल्याची चर्चा रिंगणगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात लॅब टेक्निशियनला अत्यल्प मानधन दिले जात असल्याची



चर्चा परिसरात आहे. सुमारे सहा हजार रुपयांच्या मानधनावर काम करून घेतले जात असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या मानधनाबाबत आरोग्य विभागाकडून अधिकृत स्पष्टीकरण उपलब्ध झालेले नाही. इतक्या कमी मानधनामुळे प्रशिक्षित कंत्राटी कर्मचारी दीर्घकाळ सेवा देण्यास तयार होत नसल्याने वारंवार कर्मचारी बदलण्याची वेळ येत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे लॅब सेवा सातत्याने सुरू ठेवण्यासाठी मानधनाचा प्रश्नही गांभीर्याने सोडविण्याची गरज व्यक्त होत आहे. रक्त तपासण्यांसाठी रुग्णांची बाहेर धावपळ लॅब टेक्निशियन उपलब्ध नसल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आवश्यक रक्त तपासण्या आणि इतर चाचण्यांसाठी बाहेरील खासगी प्रयोगशाळांकडे जावे लागत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे रुग्णांचा वेळ आणि पैसा खर्च होत असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांवर अतिरिक्त भार पडत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, गर्भवती महिला तसेच नियमित वैद्यकीय तपासण्यांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध होणे अपेक्षित असलेल्या मूलभूत तपासण्यांसाठी बाहेर जावे लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

दुष्काळी मदतीसाठी चांदूर बिस्वा येथे शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन!

जन सम्राट टाईम्स

मलकापूर। प्रतिनिधी: दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, यासह विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने चांदूर बिस्वा येथील मंडळ अधिकारी यांच्या दालनात सुमारे एक तास ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात परिसरातील शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांना दुष्काळी मदत म्हणून हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्यात यावे, मागील वर्षीचा तसेच चालू वर्षीचा प्रलंबित पीक विमा तातडीने अदा करण्यात यावा आणि ई-पिक पाहणीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात यावी, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या. दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून उत्पादनात घट झाल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचे आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी सांगितले.



त्यामुळे शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना विलंब न करता आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे तसेच अंबिका फाउंडेशनचे अध्यक्ष अभय पाटील यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, आंदोलनाची दखल घेत नायब तहसीलदार मरकंड यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांशी चर्चा केली. शेतकऱ्यांनी मांडलेल्या मागण्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवून त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. प्रशासनाकडून सकारात्मक आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले. मात्र, मागण्यांबाबत तातडीने कार्यवाही न झाल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिला.

उपवर्गीकरणाच्या विरोधात मुंबईत 30 लाख भीमसैनिकांचा महामोर्चा धडकणार!

रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांचा राज्य सरकारला इशारा

जन सम्राट टाईम्स

कर्जत । प्रतिनिधी: अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून राज्यात विविध संघटनांकडून आंदोलनांची मालिका सुरू असून, कर्जत येथेही २८ सप्टेंबर रोजी 'संविधान सन्मान जनआक्रोश मोर्चा' काढण्यात आला.

या मोर्चानंतर झालेल्या जाहीर सभेत रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी उपवर्गीकरणाच्या विरोधात तीव्र भूमिका मांडत, राज्य सरकारने हा निर्णय मागे घेतला नाही तर मुंबईतील मंत्रालयावर ३० लाख भीमसैनिकांचा महामोर्चा धडकविण्याचा इशारा दिला. कर्जत शहरातील आक्काबाई नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मोर्चाला सुरुवात झाली. त्यानंतर शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चा तहसील कार्यालयाकडे रवाना झाला. तहसील कार्यालय परिसरात मोर्चाचे रूपांतर 'संविधान सन्मान सभे'त झाले.

उपवर्गीकरणाला विरोध, अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या हक्कांचे संरक्षण आणि संविधानाच्या मूल्यांचे रक्षण या मागण्यांसाठी हा मोर्चा आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. 'निर्णय मागे न घेतल्यास मुंबईत महामोर्चा' जाहीर सभेला संबोधित करताना आनंदराज आंबेडकर यांनी सरकारच्या उपवर्गीकरणाच्या भूमिकेला विरोध दर्शविला. "राज्य सरकारने अनुसूचित जातींचे



उपवर्गीकरण करण्याचा प्रयत्न थांबवावा. निर्णय मागे घेतला नाही, तर राज्याच्या कानाकोपऱ्यातून ३० लाख भीमसैनिक मुंबईतील मंत्रालयावर धडकतील," असा इशारा त्यांनी दिल्याचे आयोजकांच्या व स्थानिक वृत्तांतात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वीही आनंदराज आंबेडकर यांनी उपवर्गीकरणाच्या विरोधात राज्यभर आंदोलनांची भूमिका मांडली आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या अधिकृत यादीत एकूण ५९ जातींचा समावेश असल्याची माहिती राज्याच्या समाजकल्याण विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती

मोर्चामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू अमन आंबेडकर यांच्यासह सागर रणदिवे, नागेश कांबळे, विकी सदाफुले, सिद्धार्थ झिंजाई, सुरेश बनसोडे, परशुराम इंगळे, अविनाश चव्हाण यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. तहसीलदारांना निवेदन मोर्चाच्या समारोपानंतर आंदोलकांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार रश्मी सावंत यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

सभेचे प्रास्ताविक ॲड. दत्तात्रय चव्हाण यांनी केले, तर प्रतापराव कदम यांनी उपस्थितांचे आभार मानले. दरम्यान, अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर महाराष्ट्रात यापूर्वीही विविध ठिकाणी आंदोलने झाली आहेत. जून २०२६ मध्ये मुंबईत आणि ऑगस्टमध्ये छत्रपती संभाजीनगर येथेही या मुद्द्यावर आंदोलने झाल्याचे वृत्त आहे.

घरकुल योजनेचे प्रलंबित उद्दिष्ट तातडीने पूर्ण करा!

जन सम्राट टाईम्स

पारोळा|प्रतिनिधी: तालुक्यातील पात्र व गरजू कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा, यासाठी योजनेचे प्रलंबित उद्दिष्ट तातडीने मागवून मंजूर करण्यात यावे, अशी मागणी 'ब्रिक्स ह्युमन राईट्स मिशन' संघटनेच्या वतीने पंचायत समितीचे गटविकास अधिकारी भूषण कदम यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

घरकुल योजनांसाठी पात्र असलेल्या अनेक गरजू कुटुंबांना अद्याप पक्क्या घरांचा लाभ मिळालेला नाही. सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंत घरकुलांचे निश्चित उद्दिष्ट पूर्ण करण्याचे नियोजन असतानाही काही पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचा दावा संघटनेने केला आहे. त्यामुळे उर्वरित उद्दिष्ट शासन स्तरावरून तातडीने मागवून घेऊन पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्याची प्रक्रिया गतिमान करावी, अशी मागणी करण्यात आली. संघटनेच्या प्रमुख मागण्या घरकुल योजनेचे उर्वरित उद्दिष्ट शासन स्तरावरून तातडीने मागविण्यात यावे. पात्र लाभार्थ्यांचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने निकाली काढावेत. गावनिहाय पात्र लाभार्थ्यांची पडताळणी करून घरकुल मंजुरीची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करावी. मंजूर लाभार्थ्यांना नियमानुसार अनुदानाचा निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा. घरकुल योजनेचे उद्दिष्ट निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात. तालुक्यातील गरजू व पात्र लाभार्थ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून प्रलंबित घरकुल प्रस्तावांची कार्यवाही लवकरात वकर पूर्ण करावी, अशी विनंतीही निवेदनातून करण्यात आली आहे.